जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना

निविदा / दरपत्रक

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना या कार्यालयात दिव्यांग व्यक्तींना हालचाल सुलभ करण्यासाठी फोल्ड करण्यायोग्य एकूण ८ व्हीलचेअर्स (foldable wheelchairs) खरेदी करण्यासाठी खालील तपशीलाप्रमाणे निविदा / दरपत्रक मागवित आहेत.

अ. क्र.	वस्तुंचा तपशील		दर प्रति नग	जीएसटीदर प्रतिनग	एकुण किंमत प्रतिनग	एकुण
१	फोल्ड करण्यायोग्य ८ व्हीलचेअर्स (foldable wheelchairs)	व्हीलचेअर्ससाठी वापरलेल्या लोखंडाचा गेज, व्हीलचेअर्सचा फोटो व पुर्ण विवरण				

उपरोक्त व्हीलचेअर्स खरेदी करण्यासाठी सदरील पुरवठादार / संस्थेने आपले दरपत्रक सोबत दिलेल्या ''नियम व अटींच्या'' अधिन राहून या कार्यालयाच्या पत्त्यावर सीलबंद पाकिटावर **''फोल्ड करण्यायोग्य व्हीलचेअर्सचे दरपत्रक'' असा उल्लेख** करून ते **''मा.सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना''** यांचे नांवे दिनांक २७ / ०१ / २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना

दिनांकः— १९ / ०१ / २०२६

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना

<u>या कार्यालयात दिव्यांग व्यक्तींना हालचाल सुलभ करण्यासाठी फोल्ड करण्यायोग्य एकुण ८ व्हीलचेअर्स (foldable wheelchairs) खरेदी करण्यासाठी खालील नियम व अटी लागू राहतील.</u>

१. प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी.

२. या कार्यालयाचे गरजांची पुर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येतील.

३. निविदाकाराला अधिकृत पुरवठादार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी क्रमांक नमुद करणे बंधनकारक राहील.

४. दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या करांसह, इतर चार्जेस वगैरे, यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

५. दरपत्रकामध्ये व्हीलचेअर्ससाठी वापरलेल्या लोखंडाचा गेज, व्हीलचेअर्सचा फोटो व संपुर्ण विवरण याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

६. दरपत्रक सादर करणा—या निविदाकरांचा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना या कार्यालया बरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

७. दरपत्रके सादर करतांना त्यामध्ये संदर्भीय पत्राचा उल्लेख करणे बंधनकारक राहील. सदरील सिलबंद दरपत्रक ही दिनांक २७/०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजे पर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

८. सदरील दरपत्रके पाठवितांना ती **''मा. सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण'', जालना** यांचे नावे पाठविण्यात यावी, तसेच पाकिटावर **''<u>फोल्ड करण्यायोग्य व्हीलचेअर्सचे</u> दरपत्रक''** असा उल्लेख करावा. व निविदाकराने सिल बंद

पाकीटे ही सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय परिसर, जिल्हा परिषदे समोर, अंबड चौफुली जवळ, जालना या पत्त्यावर दिलेल्या मुदतीत पाठवावी.

९. सिलबंद दरपत्रके हे सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना यांचे समक्ष त्यांच्या निजिकक्षात दिनांक २८/०१/२०२६ रोजी उघडण्यात येतील. जर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास दुस—या दिवशी किंवा ठरलेल्या वेळेत व ठिकाणी उघडण्यात येतील.

१०. उपरोक्त व्हिलचेअर्स हया या कार्यालयाने आदेश दिल्यानंतर सुस्थितीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना येथे आणुन देण्याची जबाबदारी (सर्व खर्चासह) संबंधीत पुरवठादार/संस्थेची राहिल, याची नोंद घ्यावी. वस्तु प्राप्त झाल्यानंतर या कार्यालया मार्फत वस्तु सुस्थितीत असल्या बाबतची पडताळणी करण्यात येईल. त्यानंतरच सदरची वस्तु खरेदीची रक्कम पुढील आठ दिवसांमध्ये संबंधितांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

११. सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा.अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना राखून ठेवत आहे.

सचिव

दिनांकः— १९/०१/२०२६ जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना